**युरोपीय क्षेत्रातील फ्रेंच विमानतळांवरून मार्गक्रमण करणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी 'व्हिसा-मुक्त ट्रान्झिट' सुविधेची अंमलबजावणी**

23 एप्रिल 2026

युरोपीय क्षेत्रातील फ्रेंच विमानतळांवरून प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी, व्हिसा-मुक्त ट्रान्झिट सुविधा आता फ्रेंच सरकारने कार्यान्वित केली आहे.

2. फेब्रुवारी 2026 मध्ये राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्या भारत भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी केलेल्या घोषणेपाठोपाठ ही घडामोड समोर आली आहे.

3. 10 एप्रिल, 2026 पासून, फ्रान्सच्या युरोपीय प्रदेशातून केवळ हवाई मार्गाने प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांना यापुढे 'ट्रान्झिट व्हिसा'ची आवश्यकता राहणार नाही.

4. हा निर्णय भारत आणि फ्रान्स यांच्यातील चिरस्थायी भागीदारीचे प्रतिबिंब असून, दोन्ही देशांमधील लोकांच्या प्रवासाला अधिक सुलभ करून नागरिक परस्पर संबंध दृढ करण्यासह, द्विपक्षीय संबंध बळकट करण्याबाबत दोन्ही नेत्यांची असलेली गाढ कटिबद्धता तो अधोरेखित करतो.

नवी दिल्ली

23 एप्रिल 2026